## दि.३१.१२.२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत.

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा.आयुक्त यांचे कक्षामध्ये दि.३१.१२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. या सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मा.आयुक्त, अध्यक्ष.
मा.श्री.श्रीचंद तेजवाणी, सदस्य.
मा.श्री.धिरज हिवसे, सदस्य.
मा.श्री.मधुकर घारड, तांत्रिक सदस्य.
मा.श्री.विजय भोसले, निमंत्रित सदस्य.
मा.उप-आयुक्त(प्रशा.)
मा.उप-आयुक्त(सा.)
मा.पर्यावरण अधिकारी.
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.१
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.३
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.४
मा.सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.५
मा.स.सं.न.र.अधिकारी.
मा.शहर अभियंता.
मा.उप-अभियंता, विद्युत.
मा.उद्यान अधिक्षक.
मा.श्री.एस.एस.शेंगडे, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.
मा.श्री.एस.झेड.काझी, उप-अभियंता, सा.बां.वि.

मा.उद्यान अधिक्षक, मनपा, यांनी सभेसाठी कोरम नसल्याचे सुचविले त्यामुळे मा.सभापती महोदय यांचे परवानगीने सभा १० मिनीटे स्थगित करुन सभा पुन्हा सुरुवात करण्यात आली.

विषय पत्रिकेतील,

**विषय क्र.१ :-** दि.०४.११.२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचे कार्यवृत्तांत समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आले. कार्यवृत्तांताचे सर्व सदस्यांनी अवलोकन केले.

**विषय क्र.२ :-** दि.०४.११.२०१९ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांत निर्णयाप्रमाणे कार्यपुर्ती अहवाल समिती समोर वाचून दाखविण्यात आला. समितीने कार्यवृत्तांताच्या कार्यपूर्ती अहवालाचे अवलोकन केले व अनुपालन अहवालामध्ये झोन क्र.३ चे प्रमाणे इतर झोन च्या अनुपालन अहवालामध्ये सुध्दा ठराव क्रमांक सोबत जावक क्रमांक व दिनांक नमुद करण्यात यावी. अशी दुरुस्ती मा.तांत्रिक सदस्य यांचेकडून सुचविण्यात आली.

**विषय क्र.३ :-** झोन क्र.१ ते ५ चे वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त अर्जाबाबत त्यांनी सादर केलेल्या अहवालावर चर्चा करुन निर्णय घेणे. अहवाल सादर करण्यात आले.

**उत्तर झोन क्र.१**



Scanned by CamScanner

**अर्ज क्र. १ :-** श्री.हनुमंत दे.भोंबे, आशियाड कॉलनी, अमरावती. ३ भिंगरी वृक्ष अनधिकृतरीत्या काढल्याबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०४.११.२०१९ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेमध्ये पारित करण्यात आलेल्या ठराव क्र.५ नुसार संबंधितास कारणे दाखवा नोटीस क्र.४७८, दि.०७.११/२०१९, दि.१६.११.२०१९ रोजी बजावण्यात आली असून कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने दि.२५.११.२०१९ रोजी खुलासा प्राप्त झालेला आहे. खुलासा मा.वृक्ष प्राधिकरण समिती समक्ष योग्य निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.
**ठराव क्र. १ :-** अर्जदाराचा खुलासा फेटाळण्यात येत असून अर्जदाराकडून दंड वसूल करण्यात यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** मा.अप्पर आयुक्त, अमरावती. १ गुलमोहर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२२.११.२०१९ रोजी तांत्रिक सदस्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून गुलमोहर वृक्ष किडला असून वयोवृध्द झाला असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्याबाबत तांत्रिक सदस्यांचे अहवालाचे आधारे मा.आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार क्र.८९३, दि.२६.११.१९ रोजी अटी/शर्तीचे आधीन राहून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. करीता मा.वृक्ष प्राधिकरण समितीने प्रकरणास कार्योत्तर मंजुरी प्रदान करावी हि विनंती.
**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांचाअहवाल मान्य करण्यात येत असून वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.सुधाकर काशिकर, आय.टी.आय.कॉलनी, अमरावती. १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१९.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून अर्जदाराचे घराचे आवारात असलेला आंबा वृक्ष वादळामुळे वाकला असून राहत्या घरावर झुकलेला आहे. सबब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसल्याबाबत तांत्रिक सदस्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सबब, एक वृक्षाचे बदल्यास ३ वृक्ष लागवडीकरीता अनामत रक्कम रु.१०,३४०/- स्विकारुन वृक्ष काढण्याची परवानगी प्रदान करण्यास हरकत नसावी. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समिती समक्ष उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांच्याअहवालाप्रमाणे (१ वृक्ष काढण्याचे बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे) १ x ३ x ३४६०= १०३८०/- रु.अनामत ठेव घेवून व लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षेपर्यंत सादर करावा व अहवाल सोबत जी.पी.एस. लोकेशन चे फोटो लावावे. याप्रमाणे धोरणानुसार १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** श्री.मुकुंद जोशी, राठी नगर, अमरावती. १ कडूनिंब, १ बादाम, १ जांभूळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांनी दि.०६.१२.२०१९ रोजी अर्ज सादर करुन वृक्षांच्या फांद्या छाटण्याबाबत परवानगी मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून त्यांचेकडे विविध प्रजातीची छान वृक्ष आहेत. त्यापैकी फक्त कडूलिंब या वृक्षाच्या फांद्या विद्युत तारेकडे झुकलेल्या आहेत. त्यामुळे फक्त कडुलिंब या वृक्षाच्याच फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नसल्याबाबत तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार कडूलिंब या वृक्षाच्याच फांद्या काढण्याबाबत अर्जदारास परवानगी प्रदान करण्यास हरकत नसावी. तसेच इतर वृक्षास ईजा पोहचणार नाही याची खबरदारी घेण्यास सुचित करणे योग्य होईल. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.
**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांच्याअहवालाप्रमाणे अर्जदाराला फक्त १ कडूनिंब वृक्ष च्या ४ इंच डायमिटर पर्यंतच्या विद्युत तारेकडे झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.



Scanned by CamScanner

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.विलास माळोदे, राठी नगर, अमरावती. १ इंग्रजी चिंच वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांनी केलेल्या विनंती अर्जाचे अनुषंगाने दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून वृक्ष नाल्याचे काठावर असून खुल्या जागेत आहे. तसेच वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे. वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नसल्याबाबत तांत्रिक सदस्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार अर्जदार वृक्षाच्या फांद्या काढण्यास परवानगी प्रदान करण्यास हरकत नसावी. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस माहिती व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांच्याअहवालाप्रमाणे अर्जदाराला १ इंग्रजी चिंच वृक्ष च्या २-३ इंच डायमिटर पर्यंतच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री.सुभाष वानखडे, न्यु हनुमान नगर, अमरावती. १ कडुलिंब, १ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांनी केलेल्या विनंती अर्जाचे अनुषंगाने दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून पिंपळ व कडुलिंब वृक्ष रस्त्याचे कडेला आहे. तसेच हिरवागार व छान वाढलेला आहे. कडुलिंब या वृक्षाची एक फांदी विद्युत तारेकडे झुकलेली आहे. त्यामुळे कडुलिंब वृक्षाची विद्युत तारेकडे झुकलेली २ इंच व्यासाची एक फांदी काढण्यास परवानगी देण्याबाबत तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार परवानगी देण्यास हरकत नसावी तसेच पिंपळ व कडूलिंब या वृक्षांना इजा पोहचणार नाही याची खबरदारी घेण्याबाबत अर्जदारास सुचित करणे योग्य राहील. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचाअहवाल मान्य करण्यात येत असून अहवालाप्रमाणे अर्जदाराला १ कडूलिंब वृक्ष ची विद्युत तारेकडे झुकलेली २ इंच डायमिटर पर्यंतची एक फांदी काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** श्री.सुनिल शेगोकार, साहु बाग, अमरावती. १ कडुलिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांचे विनंती अर्जाचे अनुषंगाने दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यांसमवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून कडुलिंब वृक्ष घराचे आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने झाडाच्या बुडापर्यंत कॉंक्रीट केल्याने समस्या निर्माण झाले आहे. करीता कॉंक्रीट काढण्याचे आदेश अर्जदाराला द्यावे लागेल व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्याबाबत तांत्रिक सदस्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. अर्जदाराला वृक्षाचे बुडापर्यंत केलेले कॉंक्रीट काढण्याचे पत्राव्दारे आदेशित करावे व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** श्री.प्रल्हादसिंग ठाकुर, बालाजी मंदिर अमरावती. १ कडुलिंब वृक्ष काढण्याची परवानगी तुर्त नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांनी दि.२३.०९.२०१९ रोजी विनंती अर्ज सादर करुन कडूलिंब वृक्ष वाकलेला असून हानिकारक असल्यामुळे तसेच जिवित हानी होण्याची शक्यता असल्याचे कारण नमुद करुन वृक्ष काढण्याची परवानगी मागितलेली होती. त्यानुसार दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्य यांच्या सोबत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असता अर्जदार यांना बांधकाम करावयाचे असल्यामुळे वृक्ष काढणे आवश्यक



Scanned by CamScanner

असल्याचे अर्जदार यांच्याकडून सांगण्यात आले. त्यानुसार बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यानंतर वृक्ष तोडण्याबाबत विचार करता येईल तुर्त परवानगी नाकारण्याबाबत तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे अहवालानुसार बांधकाम परवानगी नंतर वृक्ष काढण्याची परवानगी चा विचार करण्यात येईल तुर्त वृक्ष काढण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** श्री.कृष्णराव बोरखडे, हॉटेल श्रीपाद चे मागे अमरावती. ५१४५ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदार यांनी दि.१७.१२.२०१९ रोजी विनंती अर्ज सादर करुन मौजे रहाटगाव गट क्र.८४/१(अ), ८९/१(२), ८९/१(५), १२८/३(अ) व १२८/२ मध्ये असलेल्या शेत जमिनीमध्ये सागवान वृक्षांची लागवड केलेली आहे. परंतु प्रदिर्घ काळ लोटल्यानंतरही साग शेतीची अपेक्षीत वाढ झाली नाही. त्यामुळे आर्थिक नुकसान होत असल्याने शेतीतील सागवान पिक काढण्याची परवानगी मागितलेली आहे. त्या अनुषंगाने दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यांसोबत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले असून अर्जदारास १)सर्व साग वृक्षांना ४ इंच आकाराचे पिवळ्या रंगाने क्रमांक द्यावे २) स्थळ नकाशा ३) अर्जदाराची घरटॅक्स पावती ४) फोटो. इत्यादी सादर करण्याबाबत सुचित करण्याविषयी तांत्रिक सदस्य यांनी सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार अर्जदारास आवश्यक बाबींची पुर्तता करणेकरीता पत्र द्यावे लागेल. अर्जदाराकडून उक्त बाबीची पुर्तता झाल्यानंतर परवानगी देणेबाबत निर्णय घेणे योग्य राहील. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ९ :-** याच सभेत सुधारीत अहवाल वृक्ष अधिकारी यांनी सादर केला त्याप्रमाणे तांत्रिक सदस्य समवेत प्रत्यक्ष स्थळ तपासणी केली असता, अर्जदारांच्या तीन वेगवेगळ्या शेतात साग शेती केलेली असुन १) सर्वे क्र.१२८ मध्ये २८९० २) सर्वे क्र.८९ मध्ये ३) सर्वे क्र.८४ मध्ये १४९० एकुण ५१४५ साग वृक्ष वाढलेली आहेत. सामाजिक वणीकरणाचे योजनेअंतर्गत साग वन शेती केलेली होती. अर्जदाराला साग काढून बांबू लागवड करुन बांबु शेती करावयाची आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक विकास जमिनीचा करावयाचा नाही, असे अर्जदारांनी पत्रात नमुद केले असून प्रत्यक्ष भेटीसह सांगितले आहे. साग वृक्ष ६० सेमी कमी गर्थ असलेली २/३ पेक्षा जास्त वृक्ष आहेत. २४ वर्षात साग उत्पादन अनुपातात नसल्साचे अर्जदाराचे म्हणणे आहे. सबब बांबू प्लँटेशन कडे वळत असल्याचे त्यांनी सांगितले. सबब वृक्ष प्राधिकरणाच्या धोरणानुसार साग शेती वृक्ष असलेली वृक्ष काढण्याची परवानगी खालील अटीवर देण्यास हरकत नसल्याबाबत तांत्रिक सदस्यांचे मत प्राप्त झाले आहे. १) धोरणानुसार शेत सर्वे क्र.१२८, ८९ व ८४ मधील शेताच्या बांधावर येणारी सर्व साग व इतर वृक्ष काढता येणार नाही. २) साग वृक्ष व्यतिरिक्त कोणताही प्रजातीचा वृक्ष काढता येणार नाही. ३) जागेचा उपयोग व्यावसायिक विकास करण्याचे कारणाकरीता ही परवानगी वैध राहणार नाही. ४) अर्जदाराने साग वृक्ष काढल्यानंतर बांबु प्लॅन्टेशन केल्याचे माहिती (GPS कॅमेरा) अहवाल फोटोव्दारे वृक्ष प्राधिकरणाकडे सादर करण्याचे आदेशित करावे लागेल. त्याअनुषंगाने अचित निर्णयार्थ सादर.

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल अंशतः मान्य करण्यात येत आहे व संबंधित सहा.आयुक्त, तांत्रिक सदस्य व उद्यान अधिक्षक यांनी संयुक्त पाहणी करुन बांधावर येणारी व पिक म्हणून असलेली वृक्ष याची सविस्तर माहिती तयार करावी. शेताच्या १ मीटर धुऱ्यावरील वृक्ष वगळण्यात यावे. याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल पुढील सभेमध्ये ठेवावा त्यानंतर परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** उपअभियंता, उत्तर प्रभाग, म.न.पा., अमरावती. १ बाभूळ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.



Scanned by CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** बांधकाम शाखा, उत्तर प्रभाग म.न.पा. अमरावती यांच्याकडून प्रभाग क्रमांक ६ नवसारी गावठाण ते कांचण रिसॉर्ट कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व कॉंक्रीट नालीचे काम मंजुर असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली आहे परंतु नाली बांधकामाचे मधात बाभुळ वृक्ष येत असल्यामुळे उपअभियंता, उत्तर प्रभाग यांनी वृक्ष काढण्याकरीता परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्यानुसार दि.१९.१२.१९ रोजी तांत्रिक सदस्यासोबत स्थळ निरीक्षण करण्याकरीता संबंधित उपअभियंता उपस्थित नसल्याने स्थळ निरीक्षण करता आले नाही. करीता पुनश्चः स्थळ निरीक्षण करणे योग्य राहील त्यांत वृक्ष काढण्याबाबत निर्णय घेणे योग्य राहील असा तांत्रिक सदस्य यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार प्रकरण स्थळ निरीक्षण झाल्यानंतर मा.वृक्ष प्राधिकरण समिती समक्ष मंजुरीकरीता सादर करण्यात येईल. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. १० :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** श्री.संतोष मोतीराम ठाकुर, विलास नगर अमरावती. १ कडूलिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** स्थळ पाहणी करण्याकरीता अर्जदाराचे घरी तांत्रिक सदस्य समवेत वेळोवेळी भेट देण्यात आलेली आहे. परंतु अर्जदार घरी नसल्यामुळे व घराला कुलूप असल्यामुळे वृक्ष पाहणी करता आली नाही. करीता अर्जदार यांचा दि.२८.०८.१९ रोजी अर्ज नामंजुर करण्यास हरकत नसावी. प्रकरण मा.वृक्ष प्राधिकरण समितीस अवलोकनार्थ व उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** श्री.गोविंद जोशी, समर्पण कॉलनी अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** स्थळ पाहणी करण्याकरीता अर्जदाराचे घरी तांत्रिक सदस्य समवेत गेलो असता अर्जदार घरी नसल्यामुळे व घराला कुलूप असल्यामुळे वृक्ष पाहणी करता आली नाही. संबंधितांशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क केला असता प्रतिसाद दिला नाही तसेच अर्जदार यांनी विहीत नमुद अर्ज सादर केलेला नाही. त्यामुळे स्थळ पाहणी करुन प्रकरण पुढील सभेत सादर करता येईल. उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. १२ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३ :-** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. २४५ विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२७/१२/२०१९ रोजी तांत्रिक सदस्य समवेत प्रत्यक्ष स्थळ तपासणी केली असता, झोन क्र.१ मध्ये येणारी या रस्त्यावरील १५१ विविध प्रजातीची वृक्ष रस्ता रुंदीकरणात येत असल्याचे अर्जदार सा.बां.विभागाने अर्जात नमुद केले आहे. रस्ता रुंदीकरणाची गरज म्हणून खालील अटीवर १५१ वृक्ष काढण्याची परवानगी सा.बां.विभागाला देण्यास हरकत नसल्याबाबतचे तांत्रिक सदस्यांचे मत प्राप्त झाले १) रस्ता दोन्ही बाजुने ७.५ मी. रुंदीकरण (१५ मी.) करण्याचे प्रस्तावित आहे. ७.५ मी. नंतर रोडच्या कॉलर मध्ये येत असलेली सर्व वृक्ष वाचविण्यात यावी व त्या वृक्षांना १x१ मी. चौकोणी दगडी आळे करण्यात यावे. २) ज्या वृक्षांना काढावयाचे नाहीत परंतु क्रमांक घातल्याचे दिसून आले ते सर्व क्रमांक त्वरीत निर्देशानुसार मिटविण्यात यावे. ३) रस्ता रुंदिकरणात येणारी विद्युत खांब, डि.पी., अतिक्रमण व इतर सर्व अडथळे दुर केल्यानंतर सर्वात शेवटी वृक्ष काढण्याची कारवाई टप्प्या टप्प्याने करण्यात यावी. ४) काढावयाच्या वृक्षाच्या प्रती वृक्ष १=३ याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यासाठी नियमानुसार, ठेवावी लागणारी ठेव १५१x३=४५३x३४६०/- रुपये १५,६७,३८०/- (अक्षरी पंधरा लाख सदुसष्ठ हजार तीनशे ऐंशी रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम म.न.पा.फंडात जमा करणे आवश्यक राहील. ५) संबंधित रोडवर प्रती ३ मीटर अंतरावर झाडे लावण्याकरीता



Scanned by CamScanner

जागा चिन्हांकित करणे आवश्यक राहील. उपरोक्त बाबींची पुर्तता करण्याबाबतचे लेखी आश्वासन मिळणे क्रमप्राप्त राहील. त्याअनुषंगाने उचित निर्णयार्थ सादर.

**ठराव क्र. १३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. रोडच्या कॉलर मध्ये येत असलेली सर्व वृक्ष वाचविण्यात यावी व त्या वृक्षांना १x१ मी. चौकोणी दगडी आळे करण्यात यावे., ज्या वृक्षांना काढावयाचे नाहीत परंतु क्रमांक घातल्याचे दिसून आले ते सर्व क्रमांक त्वरीत निर्देशानुसार मिटविण्यात यावे., रस्ता रुंदिकरणात येणारी विद्युत खांब, डि.पी., अतिक्रमण व इतर सर्व अडथळे दुर केल्यानंतर सर्वात शेवटी वृक्ष काढण्याची कारवाई टप्प्या- टप्प्याने करण्यात यावी., काढावयाच्या वृक्षाच्या प्रती वृक्ष १=३ याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यासाठी नियमानुसार ठेवावी लागणारी ठेव १५१x३=४५३x३४६०/- रुपये १५,६७,३८०/- (अक्षरी पंधरा लक्ष सदुसष्ठ हजार तीनशे ऐंशी रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम म.न.पा.फंडात जमा करणे आवश्यक राहील., संबंधित रोडवर प्रती ३ मीटर अंतरावर झाडे लावण्याकरीता जागा चिन्हांकित करणे आवश्यक राहील, वृक्ष काढतांना जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करावा., ज्या एजन्सीने रोडचे काम घेतले आहे त्यांचे कडून वृक्ष लागवड करुन लागवड केलेल्या वृक्षांची तीन वर्षे निगा राखणेची जबाबदारी देणे बाबत अट वाढवावी. याप्रमाणे वरील अटीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**मध्य झोन क्र.२**

**अर्ज क्र. १ :-** श्री.किशोर कृष्णराव काशीकर, अमरावती. १ अशोका, १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आज दि.१६.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय - अर्जदाराकडे ३ अशोक व १ आंबा वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहेत. अर्जदाराच्या म्हणन्यानुसार चारचाकी गाडी ठेवण्यासाठी गेट करावयाचे आहे. निरीक्षणात असे दिसून येते कि सध्या सुरु असलेले गेट रुंद करण्यासाठी दोन अशोका वृक्ष काढून टाकण्याची परवानगी २x३=६x३४६०=२०७६०/- (वीस हजार सातशे साठ रुपये फक्त) वृक्ष लावण्यासाठी ठेव ठेवल्यानंतर देण्यात हरकत नाही. आंबा वृक्ष हा राजावृक्ष असल्याने त्यास परवानगी देणे शक्य नाही. तो ठेवून गेट तयार होवू शकते. सबब दोन अशोका वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे (१ वृक्ष काढण्याचे बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे) अर्जदाराला २ वृक्ष काढणेच्या बदल्यात २x३=६x३४६०=२०७६०/- (वीस हजार सातशे साठ रुपये फक्त) ठेव घेवून व लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षेपर्यंत सादर करावा याप्रमाणे धोरणानुसार २ अशोका वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.संतोष दत्तात्रय पाचपोर, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आज दि.१६.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय - कडूनिंब वृक्ष रस्त्याचे कडेला सार्वजनिक जागेवर आहे व हिरवागार आहे व परिस्थितीनुकुल वाढलेला आहे. वृक्ष तोडण्याची गरज वाटत नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** मा.डॉ.श्यामसुंदर निकम, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय परिसर, अमरावती. ३ पाम, १ कडूनिंब, १ महारुख, १ सुबाभूळ, १ शंखेश्वर असे एकूण ७ वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.



Scanned by CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आज दि.१९.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सदस्य, वृक्ष अधिकारी व उद्यान अधिक्षक यांनी संयुक्तरीत्या स्थळ निरीक्षण करण्यात आले असता श्री.हुमने व वैद्यकिय अधिकारी व लिपीक संजय हडाले हजर होते. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय अमरावती येथील परिसरातील पाहणी दरम्यान पामवृक्ष-३, कडूनिंब-१, महारुख-१, सुबाभुळ-१, शंखेश्वर-१ असे एकूण सात वृक्ष वाळलेले अत्यंत धोकादाय स्थितीत असल्याचे निदर्शनास आढळूण आल्याने वृक्ष तात्काळ काढणे गरजेचे असल्याचे संयुक्त पाहणी अहवालानुसार सदर एकूण ७ वृक्ष वाळलेले व धोकादायक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. त्याबदली त्याच परिसरात स्थानिक प्रजातीचे २ वृक्ष लावण्याचे आदेश करण्यात यावे. वृक्ष लावून अहवाल कार्यालयात सादर करण्यास आदेशित करण्यात यावे. उपरोक्त वाळलेली ७ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली. सदर प्रकरण कार्योत्तर मंजुरीकरीता वृक्ष प्राधिकरण सभेत ठेवण्याचे आदेशार्थ सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वाळलेले व धोकादायक ७ वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता देण्यात येते आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** मा.डॉ.श्यामसुंदर निकम, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय निवासस्थान, अमरावती. ३ कडूनिंब, १ निलगीरी, १ सुबाभूळ, १ शंखेश्वर असे एकूण ६ वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आज दि.२७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाले. वृक्ष अधिकारी यांनी संयुक्तरित्या स्थळ निरीक्षण करण्यात आले असता, लिपीक संजय हडाले, तेव्हा हजर होते. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय निवासस्थानातील परिसरामधील पाहणी दरम्यान कडुलिंब ३, निलगीरी १, सुबाभुळ १, शंखेश्वर १ असे एकूण सहा वृक्ष वाळलेली व अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आढळून आल्याने वृक्ष तात्काळ काढणे गरजेचे असल्याचे संयुक्त पाहणी अहवालानुसार सदर एकुण ६ वृक्ष वाळलेले व धोकादायक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. त्या बदली त्याच परीसरात स्थानिक प्रजातीचे १८ वृक्ष लावण्याचे आदेशित करण्यात यावे. वृक्ष लावून अहवाल कार्यालयात सादर करण्यात आदेशित करण्यात यावे. उपरोक्त वाळलेली ६ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात आली. सदर प्रकरण कार्योत्तर मंजुरीकरीता वृक्ष प्राधिकरण सभेत ठेवण्याचे आदेशार्थ सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वाळलेले व धोकादायक ६ वृक्ष काढण्याची कार्योत्तर मान्यता देण्यात येते आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**पुर्व झोन क्र.३**

**अर्ज क्र. १ :-** श्री.प्रकाश अवधूत तायडे, बेनोडा, अमरावती. १ चिंच वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, चिंचेच्या झाडाला कॉंक्रीटचे अतिक्रमण केल्याचे दिसून आले. त्वरीत कॉंक्रिट हटविण्याच्या सुचना देण्यात यावे. वृक्ष हिरवा व छान वाढलेला आहे. कोणतीही अडचण दिसुन येत नाही. सबब परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.साहेबराव भोपतराव रोडे, हरीओम कॉलनी, अमरावती. १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.



Scanned by CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, आंबा वृक्ष छान वाढलेला हिरवागार आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी व घराच्या दिशेने वृक्षाची मुळे येणार नाही याची उपाययोजना संबंधितांना चर्चेत सांगितले आहे.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांनी अर्जदाराला वृक्षाच्या मुळाच्या दिशेने कॉंक्रीटीकरण करणे उपाययोजनाबाबत आदेशित करावे जणेकरुन घराच्या दिशेने वृक्षाची मुळे जाणार नाही व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. ४३ विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२३.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, रस्त्याचे चौपदरी करण करण्यात येत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्री.भाकरे यांनी सांगितले झोन क्र.३ अंतर्गत ४३ वृक्ष येतात असे अर्जात नमुद आहे. परंतु प्रत्यक्ष निरीक्षणात वाळलेल्या झाडाची नोंद भुमी निरीक्षणात वाळलेल्या झाडाची नोंद नाही. भुमी अभिलेखात चिन्हांकण झाल्या नंतर काढावयाचे विद्युत खांब डिपी, अतिक्रमण, संपुर्ण अडथळे दुर झाल्या नंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात यावी. त्या बदल्यात ४३x३=१२९ वृक्षांची अनामत रक्कम १२९x३४६०=४,४६,३४०/- (अक्षरी चार लाख शेचाळीस हजार तिनशे चाळीस) घेवून परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच रस्त्याच्या कडेला ३ मीटर जागा सोडून दगडी चौकट तयार करुन वृक्ष लागवड करावी व तसा अहवाल घेण्यात यावा.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. रोडच्या कॉलर मध्ये येत असलेली सर्व वृक्ष वाचविण्यात यावी व त्या वृक्षांना १x१ मी. चौकोणी दगडी आळे करण्यात यावे. ज्या वृक्षांना काढावयाचे नाहीत परंतु क्रमांक घातल्याचे दिसून आले ते सर्व क्रमांक त्वरीत निर्देशानुसार मिटविण्यात यावे. रस्ता रुंदिकरणात येणारी विद्युत खांब, डि.पी., अतिक्रमण व इतर सर्व अडथळे दुर केल्यानंतर सर्वात शेवटी वृक्ष काढण्याची कारवाई टप्प्या टप्प्याने करण्यात यावी. काढावयाच्या वृक्षाच्या प्रती वृक्ष १=३ याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यासाठी नियमानुसार ठेवावी लागणारी ठेव ४३x३=१२९x३४६०/- रुपये ४,४६,३४०/- (अक्षरी चार लक्ष शेचाळीस हजार तीनशे चाळीस रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम म.न.पा.फंडात जमा करणे आवश्यक राहील. संबंधित रोडवर प्रती ३ मीटर अंतरावर झाडे लावण्याकरीता जागा चिन्हांकित करणे आवश्यक राहील, वृक्ष काढतांना जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करावा., ज्या एजन्सीने रोडचे काम घेतले आहे त्यांचे कडून वृक्ष लागवड करुन लागवड केलेल्या वृक्षांची तीन वर्षे निगा राखणेची जबाबदारी देणे बाबत अट वाढवावी याप्रमाणे वरील अटीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** श्री.देवेंद्र बलराम मोतकर, फ्रेजरपुरा, अमरावती. १ कडूलिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सदर अर्जदारे यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे न जोडल्यामुळे अर्जदाराच्या वृक्षाची पाहणी करण्यात आली नाही.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** उपअभियंता, नॅशनल हेल्थ मिशन, अमरावती. ११ आडजात वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७/१२/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराने बांधकामाची परवानगी स.सं.न.र. विभागाडून अद्याप घेतली नसल्याचे दिसून आले. बांधकाम परवानगी प्राप्त झाल्या नंतर प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्षांची पाहणी करुन वृक्ष परवानगी बाबत विचार करता येईल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.



Scanned by CamScanner

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणें वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** श्री.नितीन भगवंतराव गाडे, यशोदा नगर नं.१, अमरावती. १ वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७/१२/२०१९ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत पाहणी करण्यास गेलो असता अर्जदार घरी उपस्थित नव्हता. अर्जदारास फोनव्दारे वारंवार संपर्क केल्या नंतरही अर्जदाराने व्यवस्थीत माहिती दिली नाही. त्यामुळे वृक्षाची पाहणी होवू शकली नाही. आपल्या माहितीस सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** सौ.नंदा प्रफुल्ल भिल्ल, मनकर्ना नगर अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७/१२/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराचा व वृक्षाचा दुरांवये संबंध नाही सदर वृक्ष मनपा ट्रि गार्ड मध्ये सार्वजनिक जागेवर आहे. सबब परवानगी नाकारण्यात यावी. तसेच अर्जदारास नियमाप्रमाणे २ वृक्ष लावण्याचे फरमाविण्यात यावे.

**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वडाळी परिक्षेत्र अमरावती. १ अंजन वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१७/१२/२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अंजन प्रजातीचा व त्याला लागुन १ वृक्ष असे २ वृक्ष सोबत वाढलेले व हिरवेगार आहे. कोणताही धोका संभवत नाही. तसेच वृक्षाला लागलेली किड प्रयोगशाळेत तपासणी करीता पाठविण्यात येत असून त्यांचे निदान झाल्या नंतर वृक्ष काढावयाचा किंवा कसे याबाबत ठरविता येईल. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येईल. वृक्षाला बुंध्यापर्यंत टाईल्स लावलेल्या आहेत. त्या काढण्याच्या सुचना करण्यात याव्यात.

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे तसे पत्राने कळवावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ९ :-** सौ.साधना हटकर, यशोदा नगर नं.१, अमरावती. १ पिंपळ वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** मागिल सभा दि.१३/०८/२०१९ ठराव क्र.१३ नुसार कार्यवाही करण्यास हरकत नाही. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** श्री.रघुनाथ गोमाजी माहोरे, वामन सोसायटी डेंन्टल कॉलेज समोर, अमरावती. १ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** अर्जदाराचे अपिल मान्य करण्यास हरकत नाही. अर्जदाराला साग धोरणानुसार १ वृक्ष स्थानिक प्रजातीचा लावून नियमानुसार (जी.पी.एस. कॅमेरा फोटो सह) अहवाल पाठविण्याचे सुचित करण्यात यावे. त्याप्रमाणे ठेव घेवून वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र. १० :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे १ सागवान वृक्ष काढण्याच्या बदल्यात त्याच प्रजातीचा १ वृक्ष लावणे याप्रमाणे १ x १ x ३४६०= ३४६०/- रु.अनामत ठेव घेवून व लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा अहवाल



Scanned by CamScanner

दर सहा महिन्यांनी तीन वर्षेपर्यंत सादर करावा याप्रमाणे धोरणानुसार १ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** अ) श्री.प्रेमराज टेकडे, किशोर नगर, ब) श्री.पांडे यांच्या घराजवळ सार्वजनिक जागेवर किशोर नगर, क) बुध्दभुमी किशोर नगर, अमरावती. एकूण ३ वाळलेले वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** सन्मा.सदस्या श्रीमती जयश्री कुऱ्हेकर यांनी भ्रमणध्वनी वरुन दिलेल्या तक्रारी वरुन श्री.प्रेमराज टेकाडे यांना १ वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच वृक्ष तोड कंत्राटदार श्री.अकिल शेख यांना दि.२०/११/२०१९ रोजी दुपारी २ वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. कृपया कार्योत्तर मंजुरात देण्यात यावी.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष तोडण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** श्री.प्रफुल्ल कोळी, अमरावती. वृक्षाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** आपले सरकार वरील प्राप्त तक्रार सदर तक्रारी नुसार विद्युत तारेकडे झुकलेल्या वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी मा.कार्यकारी अभियंता एम.एस.ई.बी. यांना दि.०७/११/२०१९ रोजी देण्यात आली आहे. कृपया कार्यत्तोर मंजुरात देण्यात यावी.

**ठराव क्र. १२ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे वृक्ष च्या फांद्या तोडण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**दक्षिण झोन क्र.४**

**अर्ज क्र. १ :-** श्री.शरदचंद्र श. कुलकर्णी, शिवशक्ती कॉलनी, अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२२.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - सागवान वृक्ष अर्जदाराच्या घराच्या आवारात वाढलेले असून १५० cm पेक्षा जास्त गर्भ असलेला आहे. धोरणानुसार परवानगी देण्यास हरकत नाही.

**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे धोरणानुसार २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.मनोहर दामोदर हिरुळकर, कोंडेश्वर विद्युत कॉलनी, अमरावती. १ गुलमोहर वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२२.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - गुलमोहर वृक्ष सुकलेला आहे. वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला आल्याने मनपाने त्वरीत कार्यवाही करावी व त्या बदली तीन वृक्ष लावण्याचे निश्चित करावे. सुकलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. अहवालानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही करण्यात आली असून कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे १ सुकलेला वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.किसन मुराजी महाजन, कंपासपुरा बडनेरा. १ कडुनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.



Scanned by CamScanner

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१८.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - कडुनिंबाचे वृक्ष घरात वाढलेला आहे झोपडपट्टी व नझुल परिसर असल्याने जागेचा प्रश्न आहे. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वृक्ष तोडतांना शेजारी असनाऱ्या कुटुंबाची हानी होणार नाही याबाबत निर्देशित करण्यात यावे. कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे १ कडुनिंब वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** श्री.राजेश सुधाकर आखेगावकर, वनश्री कॉलनी, दस्तुर नगर अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१८.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदार वृक्षप्रेमी आहे त्यांचेकडे ४ सागवान, २ चिकु, २ पेरु, व २ निंबु वृक्ष असे एकुण १० वृक्ष आहे त्यापैकी त्यांना २ सागवान वृक्ष पश्चिम दिशेकडील काढायची असून ती परिपक्व झालेली आहे. ६० cm पेक्षा जास्त गोलायीची आहे. सबब साग वृक्ष धोरणाआधिन राहुन काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. कार्योत्तर मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे २ सागवान वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** श्री.जितेश रामेश्वर चौधरी, एकविरा विद्युत कॉलनी, अमरावती. २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराकडे सागाची दोन वृक्ष आहे त्याची गोलाई ८० सेमी. पेक्षा अधिक असल्याचे दिसुन आले. धोरणाप्रमाणे म्हणजेच २x१=२x३४६०=६९२०(सहा हजार नऊशे वीस रुपये फक्त) रुपये ठेव भरुन घेतल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच अर्जदाराचे शेजारी श्री.दिपक खरे यांनी अर्जदारास झाडाची पाने पडल्यास कचरा होतो म्हणुन भांडण करुन तोडण्यासाठी दबाव आणण्याचे सांगण्यात आले. श्री.खरे यांचे घराचे परिसराचे निरीक्षणार्थी असे दिसून आले की, त्यांचे घराच्या परिसरात एकही वृक्ष लावलेला नाही. सबब नागरीक्षेत्र झाडाचे संवर्धन व जतन अधिनियम १९७५ चे सेक्शन ५ कलम १(१) नुसार स्वत:चे घरी २ वृक्ष लावून वाढविणे आवश्यक आहे. परंतु श्री.खरे यांचेकडे एकही वृक्ष लावून वाढविलेला दिसत नाही. सबब श्री. खरे यांना कायद्याचे उपरोक्त कलमान्वये नोटिस देवून दि.३० डिसेंबर २०१९ पर्यंत २ वृक्ष लावून अहवाल पाठविण्याचे फरमाविण्यात यावे. त्यांनी वृक्ष लागवड केल्याचा अहवाल पाठविला नाही तर त्यांचे विरुध्द दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. अहवालानुसार मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. ५ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवाल मान्य करण्यात येत आहे व २ x १= २ x ३४६०= ६९२०/- रु.अनामत ठेव घेवून व लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षेपर्यंत सादर करावा याप्रमाणे धोरणानुसार २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ६ :-** प्रभाग क्र.२२, दक्षिण झोन क्र.४ बडनेरा. २ कडुनिंब वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - मनपाचे अभियंता श्री.तांबेकर हजर होते सार्वजनिक शौचालयासाठी (स्वच्छता गृह) बांधकाम सुरु करण्यात आले आहे. बांधकामात प्रत्यक्षात येणारे एक कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. त्याबदली तीन वृक्ष मनपा अभियंता यांनी स्वत: निगराणीत लावावेत तसेच बांधकामाचे उत्तरेकडील(रोडकडील भागात) भिंगरी वृक्ष व एक कडूनिंब वृक्ष आहे. त्यापैकी कडुनिंब वृक्षाची दक्षिणेकडे झुकलेली (६० सेमी)



Scanned by CamScanner

व्यासाची फांदी काढुन टाकण्यात यावी व दोन्ही वृक्ष वाचविण्यात यावे. अहवालानुसार वृक्ष काढण्याची कार्यवाही करीता मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ६ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे १ कडूनिंब वृक्ष काढण्याची (१ वृक्ष काढण्याचे बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे) धोरणानुसार परवानगी देण्यात येत आहे व १ कडूनिंब वृक्षाची दक्षिणेकडे झुकलेली (६० सेमी) व्यासाची फांदी काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ७ :-** सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. ५१ विविध वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२३.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - १) वृक्ष काढण्याचा झोन क्र.४ बडनेरा, बांधकाम विभागाचा अर्ज आहे. पुर्वी क्रमांक घातलेली परंतु पहिल्या निरीक्षणात सुचना केल्यानंतर वाचविण्यात येत असलेल्या सर्व वृक्षाची क्रमांक त्वरीत मिटविण्यात यावी. २) भुमी अभिलेख यांची जागा चिन्हांकित केल्यानंतर असलेले अडथळे जसे विद्युत पोल डी.पी. अतिक्रमण हटविण्यात आल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही. ३) रस्त्याचे दोन्ही बाजुला प्रत्येकी ३ मीटरवर वृक्ष लावण्यासाठी जागा चिन्हांकित करण्यात याव्यात व त्यात दगडी चौकटी तयार करुन त्यात वृक्ष लावण्याचे नियोजन करावे. ५१ वृक्ष काढण्यासाठी बदली वृक्ष ५१x३=१५३ वृक्ष लावण्याचे नियोजन (स्थानिक प्रजातीचे वृक्ष) करावे. व त्यासाठी ठेव ठेवण्यात यावी. १५३x३४६०=५,२९,३८०/- (अक्षरी- पाच लक्ष एकोणतीस हजार तीनशे ऐंशी रुपये फक्त) भरल्यानंतर वृक्ष काढण्याची नियमानुसार परवानगी देण्यास हरकत नाही. अहवालानुसार १५३ वृक्ष लगवडीचे नियोजन केल्यानंतर व तसेच ५,२९,३८०/- चा भरणा केल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी देता येईल तरी मंजुरीकरीता सादर.

**ठराव क्र. ७ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येत आहे. रोडच्या कॉलर मध्ये येत असलेली सर्व वृक्ष वाचविण्यात यावी व त्या वृक्षांना १x१ मी. चौकोणी दगडी आळे करण्यात यावे. ज्या वृक्षांना काढावयाचे नाहीत परंतु क्रमांक घातल्याचे दिसून आले ते सर्व क्रमांक त्वरीत निर्देशानुसार मिटविण्यात यावे. रस्ता रुंदिकरणात येणारी विद्युत खांब, डि.पी., अतिक्रमण व इतर सर्व अडथळे दुर केल्यानंतर सर्वात शेवटी वृक्ष काढण्याची कारवाई टप्प्या टप्प्याने करण्यात यावी. काढावयाच्या वृक्षाच्या प्रती वृक्ष १=३ याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यासाठी नियमानुसार ठेवावी लागणारी ठेव ५१ x ३= १५३ x ३४६०/- रुपये ५,२९,३८०/- (अक्षरी पाच लक्ष एकोणतीस हजार तीनशे ऐंशी रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम म.न.पा.फंडात जमा करणे आवश्यक राहील. संबंधित रोडवर प्रती ३ मीटर अंतरावर झाडे लावण्याकरीता जागा चिन्हांकित करणे आवश्यक राहील, वृक्ष काढतांना जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याचा प्रयत्न करावा., ज्या एजन्सीने रोडचे काम घेतले आहे त्यांचे कडून वृक्ष लागवड करुन लागवड केलेल्या वृक्षांची तीन वर्षे निगा राखणेची जबाबदारी देणे बाबत अट वाढवावी. याप्रमाणे वरील अटीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ८ :-** श्री.नंदकुमार बिंदरकर, स्वागतम कॉलनी, गोपाल नगर अमरावती. १ वड वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.०७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - वडाचे वृक्ष सार्वजनिक जागेवर छान वाढलेले व हिरवेगार आहे. तारेकडे झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या पुर्वेकडील फांद्या उद्यान विभागाने शक्तीमान यंत्राव्दारे काढण्यास हरकत नाही. वडाच्या पारंब्यांना (वरुन येणारी मुळे) ~~जी गार्ड लावून~~ जमिनीत जावू देण्यासाठी २ ट्रि गार्ड लावण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. त्याशिवाय झाड सुरक्षित राहणार नाही. अहवालानुसार फांद्या तोडण्याचे मंजुरीस सादर.

**ठराव क्र. ८ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व १ वड वृक्ष च्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**अर्ज क्र. ९ :-** प्रतिभा रमेशराव पवार, संताजी नगर, अमरावती. १ काटेरी चिंच वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१८.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - इंग्रजी चिंचेचे वृक्ष हिरवेगार व रस्त्याचे कडेला शेजाऱ्यांच्या घराजवळ आहे. अर्जदाराचे काहीही संबंध नाही. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. व अर्जदाराचा २४५० फुट प्लॉट आहे, त्यांनी एकही वृक्ष लावलेला दिसुन आला नाही सबब अर्जदारास ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत २ वृक्ष लावण्याचे व अहवाल पाठविण्याचे फरमाविण्यात यावे. अहवाल प्राप्त न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत अर्जदारास कळविण्यात यावे. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. ९ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १० :-** श्री.निकेश वसंतराव सोनोने, ब्राम्हणपुरा कंपासपुरा, बडनेरा. १ महारुख वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१८.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - महारुख वृक्ष श्री.देशपांडे यांचे मोकळ्या जागेवर वाढलेला आहे. मोकळ्या जागेची स्वच्छता नसल्याने घाणीचा प्रश्न निर्माण झाला आहे. सबब प्लॉट मालकाला नोटिस देवून स्वच्छता करण्यास सांगावे. वृक्ष हिरवागार व छान वाढलेला आहे. सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. १० :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ११ :-** श्रीमती भावना अशोक सारडा, जयस्तंभ चौक नवीवस्ती, बडनेरा. १ काटसावर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२६.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - वृक्ष मनपाचे सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला लावलेला असून मोठ्या परिश्रमाने वाढविलेला आहे वृक्ष छान व हिरवेगार वाढलेला आहे. अर्जदाराने त्याचे दुकानाचे अतिक्रमण झाडापर्यंत केलेले आहे, झाडाला वेढण्याचा व नष्ट करण्याचा प्रयत्न दिसून येतो. सबब याबरोबरच या रस्त्यावरील सर्वांचे झाडापर्यंत दुकानाचे अतिक्रमण केलेले आहे. मनपाने त्वरीत अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करुन वृक्षाची देखभाल करावी. वृक्ष तोडण्याची फांद्या छाटण्याची परवानगी अजिबात देवू नये व वृक्षाला कोणतीही इजा पोहचु नये असे फरमाविण्यात यावे. सदर अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. ११ :-** वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १२ :-** श्री.सुरेश रामेश्वर जोशी, जुनीवस्ती चंद्रनगर, बडनेरा. १ कडूनिंब, १ महारुख वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२७.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराला लेआऊट टाकायचे आहे परंतु त्यांनी अकृषक/ससंनर ची परवानगी घेतली किंवा कसे? दिसून आले नाही हि विचारणा करण्यात यावी. तसेच वृक्ष प्रत्यक्ष लेआऊट मध्ये येत नाही. करीता वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात यावी. अर्जदाराने त्या परिसरात असलेल्या वृक्षांना कोणतीही इजा पोहचवू नये असे फरमाविण्यात यावे. अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.



Scanned by CamScanner

**ठराव क्र. १२** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १३** :- सौ.अनिता दादाराव मेश्राम, मिलचाळ नवीवस्ती, बडनेरा. साई बाभुळ व इतर (एकूण ४) वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२६.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराने त्यांच्या राहत्या घराचे (अतिक्रमण झोपडपट्टी) परिसरात असलेल्या सर्व झाडांच्या फांद्या अगोदरच काढल्याचे दिसून आले. अर्जदाराच्या घरातील वृक्षाचा शेजाऱ्याला त्रास असल्याचे त्यांनी सांगितले. सबब शेजाऱ्याला समज देण्यात आली. वृक्ष तोडण्याची आवश्यक्ता नाही. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. अर्जदाराने वृक्षाला इजा पोहचु नये असे फरमाविण्यात यावे. अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. १३** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १४** :- सहा.अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती. १ वड वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.२३.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - वडाचे वृक्ष हिरवेगार व छान वाढलेला आहे व रस्त्याचे कडेला आहे. त्याला लागुन असलेले मंदिर रस्त्यावर आहे ते मंदिर हटविण्याची कार्यवाही करण्यात यावी. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकरण्यात यावी. मंदिर हटविल्यानंतर संबंधित अभियंता सोबत पुन्हा पाहणी करण्यात येईल. अहवालानुसार वृक्ष तोडण्याकरीता परवानगी नाकारण्याकरीता सादर.

**ठराव क्र. १४** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. १५** :- श्री.हरीओम शांती लॉन, बडनेरा रोड प्रो.प्रा.शशांक विजय खंडेलवाल. ६ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल -** दि.१८.११.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल - अर्जदाराचे हरिशांती लॉन हे मोठ्या परीसरात असलेले व्यावसायीक प्रतिष्ठान आहे. अर्जदाराचे ७ सुकलेली वृक्ष दिसून आली प्रत्यक्ष निरीक्षणाने लक्षात आले की, सर्व झाडांना रिंग करुन कुऱ्हाडीने करवा केलेला आढळला त्यामुळे ती सर्व वृक्ष सुकलेली नसून सुकविण्यात आलेली आहे व नष्ट करण्याचा अवैध प्रयत्न केला आहे. सबब अर्जदाराला दंडात्मक कार्यवाही करण्याची नोटीस देवून खुलासा मागविण्यात यावा व त्यानंतर सुकविण्यात आलेली ६ वृक्ष (प्रतीवृक्ष ५०००/- याप्रमाणे) ६x५०००=३००००/- रुपये(अक्षरी तीस हजार रुपये फक्त) दंड व त्याबदली ६x३=१८x३४६०=६२२८०/ रुपये व सुकलेला एक कडूनिंब वृक्षाचे बदली एक वृक्ष लावण्यासाठी १x३४६०/- (तीन हजार चारशे साठ रुपये फक्त) ठेव ठेवल्यानंतर व दंड भरल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात यावी. त्यास हरकत नाही. सदर अहवालाचे अनुषंगाने दि.२६.१२.२०१९ रोजी पत्र दिले आहे. खुलासा प्राप्त झाल्यानंतर तसेच दंडात्मक रक्कमेचा भरणा केल्यानंतर प्राप्त खुलासा मा.सभेसमक्ष ठेवणे उचित राहील. तोपर्यंत वृक्ष तोडण्याबाबतची परवानगी नाकरण्याकरीता सादर.

**ठराव क्र. १५** :- वृक्ष अधिकारी यांचा अहवाल मान्य करण्यात येते आहे व वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

**विषय क्र. ४ :- मा.सभापती, यांच्या मंजुरीने वेळेवर येणारे विषय.**

**झोन क्र. १ :-**

**अर्ज क्र. १ :-** सन्मा.श्री.दिनेश बुब, नगरसेवक, मनपा. अमरावती.
**विषय :-** चित्रा टॉकिज ते सतिधाम कॉम्पलेक्स कडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या ३ झाडांची छाटणी करणेबाबत.
**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांनी पाहणी करुन पुढील आवश्यक कार्यवाही करुन घ्यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** सन्मा.श्री.दिनेश बुब, नगरसेवक, मनपा. अमरावती.
**विषय :-** मौजे अमरावती सिट क्र.३७ प्लॉट क्र.५/१ चा पोट हिस्सा मधील प्लॉट २०८ चौ.मी. येथील २० फुट उंचिचे पुर्ण वाढ झालेले आंब्याचे एक वृक्ष एका जागेवरुन काढून दुसऱ्या जागेवर लावण्याची परवानगी मागीतली आहे, सदर वृक्ष काढून दुसरीकडे लावण्यात येणारा खर्च सुध्दा संबंधित नगरसेवक त्यांचे स्वेच्छा निधी मधून करण्यास तयार आहे. उद्यान विभागाकडून पाहणी केली असता सदर आंब्याचे वृक्ष काढून पुर्नरोपण करुन पाहण्यास हरकत वाटत नाही.
**ठराव क्र. २ :-** आंब्याचे वृक्ष काढून पुर्नरोपण करण्याची कार्यवाही तांत्रिक पध्दतीने तपासून करण्यात यावी. सदर बाबत परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**झोन क्र. २ :-**

**अर्ज क्र. १ :-** सौ.सरोज प्रकाश भटकर, विजय कॉलनी, अमरावती. १ कडूनिंब वृक्ष काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** आज दि.२०.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. बांधकाम सुरु करण्यात आले आहे. बांधकामाची परवानगी ससंनर अभियंता मनपा यांनी दिल्याचे दिसून आले. तथापि वारंवार सूचना देवूनही ससंनर विभाग व मनपा अभियंते मंजुर नकाशात प्रत्यक्ष बांधकामात येणाऱ्या या वृक्षांना लाल रंगाने चिन्हांकित करणे बांधकामा बाहेर येणाऱ्या वृक्षांना हिरव्या रंगाने चिन्हांकित करणे गरजेचे असने तथापि तसे केल्याचे दिसून येत नाही. सबब ससंनर/मनपा अभियंता यांना प्रकरण पाठवून बांधकामात वृक्ष येतो किंवा कसे याबाबत नियमानुसार चिन्हांकीत करावे व प्रत्यक्ष स्थळावर संयुक्त पाहणीसाठी उपस्थित राहण्याचे आदेशित करण्यात यावे. तोपर्यंत वृक्ष तोडण्याचे परवानगी नाकारण्यात यावी व अर्जदाराने वृक्षाला इजा पोचवू नये असे फर्माविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.
**ठराव क्र. १ :-** वृक्ष अधिकारी यांच्याअहवालाप्रमाणे स.सं.न.र. यांचे सोबत वृक्ष अधिकारी यांनी पाहणी करुन निर्णय घ्यावा व स.सं.न.र. यांनी यापुढे नकाशात नोंद घ्यावी तुर्त वृक्ष काढण्याची परवानगी नाकरण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. २ :-** श्री.मदन तांबेकर, खैर कंपाऊंड अमरावती. १ सोनसाग वृक्ष(शिवण वृक्ष) काढण्याची परवानगी नाकारणेबाबत.
**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** आज दि.२८.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. मा.तांत्रिक सल्लागार यांचा अभिप्राय- प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले.



Scanned by CamScanner

सोनसाग वृक्ष(शिवण वृक्ष) हिरवागार व छान वाढलेला आहे. वाढलेल्या फांद्या मनपाच्या शक्तीमान मशिनव्दारे पुर्वीच काढण्यात आल्याचे सांगण्यात आले. फांद्या काढण्यास कार्योत्तर मान्यता देण्यास हरकत नाही. वृक्षाच्या बुडाला खोडापर्यंत काँक्रीट मोठ्या प्रमाणात केल्याने कंपाऊंड वॉलवर वृक्ष झुकलेला आहे. बुडापर्यंत केलेले काँक्रीट त्वरीत हटविण्याच्या सूचना दिल्या वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पाचवू नये असे अर्जदारास कळविण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. २ :-** वृक्ष अधिकारी यांनी पुन:पाहणी करुन मा.सभापती यांचे परवानगीने निर्णय घ्यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ३ :-** श्री.हंबर्डे(सहा.अभियंता) मध्ये झोन क्र.२,मनपा, अमरावती. २ मुंगना, १ कडुबदाम वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** आज दि.१२.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता, खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाले. उपअभियंता मध्य झोन क्र.२ मनपा यांच्या अहवालानुसार खापर्डे बगीचा गुणवंत बाबा मंदिरापासून नाल्याचे बांधकाम करावयाचे असल्याने नाल्याचा अगदी काठावर येत असलेले दोन मुंगनाचे व एक कडुबदामचे वृक्ष नाला बांधकामामध्ये येत असल्याने ते तोडणे आवश्यक वाटते. करीता झाडे तोडण्याची मंजुरी प्रदान करणे करीता प्रकरण वृक्ष प्राधिकरण सभेमध्ये मान्यतेसाठी वृक्ष प्राधिकरण समक्ष सादर. उचित निर्णयास्तव सादर.

**ठराव क्र. ३ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे २ मुंगना, १ कडुबदाम एकूण ३ वृक्ष काढण्याची (१ वृक्ष काढण्याचे बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे) संबंधित विभागाने ९ वृक्षाची लागवड करुन वृक्ष जोपासण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ४ :-** मा.शहर अभियंता, मनपा, अमरावती.

**विषय :-** राजापेठ रेल्वे क्रॉसिंग येथील उड्डाणपुलाचे बांधकामात येणारे ३ अशोका वृक्ष काढण्याची व २ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ४ :-** वृक्ष अधिकारी यांच्या अहवालाप्रमाणे ३ अशोका वृक्ष काढण्याची (१ वृक्ष काढण्याचे बदल्यात ३ वृक्ष लावणे याप्रमाणे) ३ x ३ = ९ वृक्ष लावणे व जोपासना करणे या अटीवर परवानगी देण्यात येत आहे व २ पिंपळ वृक्ष च्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

**अर्ज क्र. ५ :-** सौ.वैभवी संदिप वडूरकर, कडीया नगर, राजापेठ, अमरावती.

**विषय :-** अशोकाचे उंच वाढलेले झाडाच्या फांद्याचा विजेला स्पर्श होत असल्याने काढण्याबाबत.

**ठराव क्र. ५ :-** विषय दाखल करुन घेवून पुढील सभेत अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

**झोन क्र. ३ :-**

**अर्ज क्र. १ :-** श्री.सतेश्वर नागोराव मोरे, यशोदा नगर अमरावती. १ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी मिळणेबाबत.

**तांत्रिक सदस्य यांचा अहवाल :-** आज दि.३०.१२.२०१९ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले सागवान वृक्ष परिपक्व झालेले आहे परंतु अर्जदाराने त्याच्या फांद्या पुर्वीच छाटून टाकल्या आहेत. विना परवानगी वृक्षाच्या मोठ्या प्रमाणात फांद्या तोडण्याबद्दल विचारणा करण्यात यावी. तसेच वृक्ष परिपक्व झाला असून वाळत असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी १ = १x ३४६० = ३४६० (तीन हजार चारशे साठ रुपये फक्त) ठेव



Scanned by CamScanner

ठेवल्यानंतर धोरणानुसार देण्यात यावी तसेच बदली वृक्ष घराचे परिसरात असून अहवाल (नियमाप्रमाणे) पाठविण्याचे सूचित करण्यात यावे. वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.

ठराव क्र. १ :- १ सागवान वृक्ष काढणे १ X ३४६० = ३४६०/- (तीन हजार चारशे साठ रुपये फक्त) ठेव ठेवल्यानंतर व लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा अहवाल दर सहा महिन्यांनी तीन वर्षेपर्यंत सादर करावा याप्रमाणे धोरणानुसार १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्र. २ :- मा.उद्यान अधिक्षक, उद्यान विभाग मनपा अमरावती. मनपा छत्री तलाव उद्याना मधील खळंग, वाळलेली व धोकादायक ६ वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी मिळणेबाबत व इतर वाळलेली आवश्यक काढावयाची वृक्षाची पाहणी करुन परवानगी करीता सादर.

ठराव क्र. २ :- खळंग वाळलेली व धोकादायक ६ वृक्ष काढण्याची कार्योत्तर परवानगी देण्यात येत आहे व इतर वाळलेली आवश्यक काढावयाची वृक्षाची वृक्ष अधिकारी व तांत्रिक सदस्यांसोबत उद्यान विभागाने पाहणी करावी व आवश्यक्तेप्रमाणे कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्र. ३ :- सन्मा.श्री.आशिषकुमार अशोकराव गावंडे, अमरावती.

विषय :- धोकादायक असलेले बंगाल बाभुळीचे झाड काढण्याबाबत.

ठराव क्र. ३ :- संबंधित बाभुळ जातीच्या वृक्षाची वृक्ष अधिकारी यांनी पाहणी करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर

झोन क्र. ४ :-

विषय क्र. १ :- कोंडेश्वर नाका येथील सर्व्हे क्र.११० मौजा- बडनेरा मधील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पातील अंदाजे विविध ५४ वृक्ष (सरासरी ३ ते ५ वर्षे वयाचे) तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

ठराव क्र. १ :- विविध ५४ वृक्ष काढणे, ५४ X ३ = १६२ वृक्ष स्थानिक प्रजातीची किंवा कडूनिंब प्रजातीची वृक्ष लावणे व जोपासने या अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्र. २ :- सन्मा.श्रीमती संध्या सदाशिव टिकले, नगरसेविका मनपा, अमरावती.

विषय :- साधना कॉलनी, वनश्री कॉलनी व न्यु कॉलनी येथील वडाच्या झाडाच्या फांद्या व पारंब्या छाटण्याबाबत.

ठराव क्र. २ :- पत्र दाखल करुन पुढील सभेत अहवाल सादर करावा.

ठराव सर्वानुमते मंजुर

अर्ज क्र. ३ :- मा.उद्यान अधिक्षक, उद्यान विभाग, मनपा, अमरावती.

विषय :- १.मोती नगर उद्यान, २.रामपुरी कॅम्प उद्यान, ३.लक्ष्मी नगर उद्यान, ४.कॉंग्रेस नगर उद्यान, ५.समर्थ कॉलनी उद्यान, ६.एल.आय.सी.कॉलनी उद्यान, ७.प्रशांत नगर उद्यान, ८.मधुबन कॉलनी उद्यान, सदर उद्यानातील ४ इंच पर्यंतच्या आवश्यक त्या फांद्या काढण्याची उद्यान विभागास परवानगी करीता सादर.

ठराव क्र. ३ :- ४ इंच पर्यंतच्या आवश्यक त्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. यापुढे उद्यानातील फांद्या काढण्याबाबत उद्यान विभागाने आपले स्तरावर पाहणी करुन आवश्यक परवानगी द्यावी व कार्योत्तर मान्यतेस सादर करण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजुर



Scanned by CamScanner

वृक्ष प्राधिकरण सभा महिण्याच्या १५ तारखेला घेण्यात यावी. १५ तारखेला सुटी असल्यास त्यापुढील दिवशी सभा घ्यावी. याबाबत सुरुवात दि.१५ फेब्रुवारी २०२० पासून करण्यात यावी तसेच मनपा क्षेत्रातील असणारे वडाचे वृक्षाची पाहणी उद्यान विभागाने करावी व वडाच्या पारंब्या जमिनीत लावण्यात याव्या. असे निर्देश मा.सभापती महोदय यांनी दिले. यानंतर कार्यक्रम पत्रीकेवरील विषय संपुष्टात आल्यामुळे उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**मा.सभापती तथा आयुक्त,**
**महानगरपालिका, अमरावती**



Scanned by CamScanner